# झोपडपट्ट्यांच्या विकासात शहराचे स्वास्थ्य

## प्रत्येकाने एक तरी झोपडपट्टी विकसित करावी

**पुणे :** झोपडपट्टीत राहणारा वर्ग हा घटक हा शहराच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाचा आहे. त्याचा विकास झाला पाहीजे. तर शहराचे सामाजिक स्वास्थ्य चांगले राहू शकते. ही जबाबदारी प्रत्येक बांधकाम व्यावसायिकाने उचलली पाहीजे. प्रत्येक विकसकाने शहरातील एक तरी झोपडपट्टीचे 'एसआरए' योजनेतंर्गत पुर्नवसन करावे अशी अपेक्षा राज्याच्या नगर रचना विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी येथे व्यक्त केली. दांडेकर पूल येथे नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्‌घाटन व ग्राहकांना सदनिका हस्तांतरणाचा कार्यक्रम शनिवारी डॉ. करीर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.




पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही आज झोपडपट्टीमध्ये राहत असल्याचे नमूद करीत डॉ. करीर म्हणाले, 'जगभरात झोपडपट्टीचे पुनर्वसन हे शहराच्या बाहेर लांब गेले जाते. परंतु, आपल्या देशांत झोपडपट्टीचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन केले जाते. येथील नागरिकांना चांगल्या सुविधा देऊन त्यांचे राहणीमान सुधारणे आवश्यक आहे.

झोपडपट्टीत राहणारा वर्ग हा घटक हा शहराच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाचा आहे. त्याचा विकास झाला पाहिजे. तर शहराचे सामाजिक स्वास्थ्य चांगले राहू शकते. ही जबाबदारी प्रत्येक बांधकाम व्यावसायिकाने उचलली पाहिजे. तेथे नफा थोडा असला तरी ते काम करणे गरजेचे आहे. एकावेळी चार बांधकाम व्यावसायिकांनी एकत्रित येऊन हे काम केले तरी चालेल.'

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) च्या कार्यपद्धतीवर डॉ. करीर यांनी चिंता व्यक्त केली. एसआरएची स्थापना ही १४ वर्षांपूर्वी झाली. त्यावेळी क्रेडाईने मशाल या सामाजिक संस्थेच्या मदतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये एक सर्व्हे केला गेला.

त्याची एक पुस्तिकाही छापली गेली. मात्र त्यानंतर प्रत्येक झोपडपट्टीतील पात्र आणि अपात्र झोपडपट्टीधारक याची माहिती देणे गरजेचे होते. एसआरएने बांधकाम व्यावसायिक आणि झोपडपट्टीधारक यांच्यात समन्वयकाची भूमिका बजाविली पाहीजे होती.